# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १२५ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०५ आषाढ शके १९४८, शुक्रवार दि.२६ जून २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## भारतात प्रियकराच्या मोहापायी पतीच्या हत्येच्या घटनांत वाढ

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

तरुणांमध्ये हिंसक आणि क्रूर प्रवृत्ती वाढीस लागणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.१८ ते २५ वयोगटातील तरुणांचा गंभीर गुन्ह्यांमध्ये (उदा. हत्या, खंडणी, मारहाण) वाढता सहभाग हे समाजाच्या भविष्यासाठी धोक्याचे लक्षण आहे. आपले इसिप्स पूर्ण होत नसेल तर एखाद्याची हत्या करणे, स्वतः आत्महत्या करणे इथपर्यंत आजच्या झेन जी मजल गेली आहे. मागचा पुढचा विचार न करता एखाद्याची हत्या करणे त्याचा गेम करणे किंवा स्वतः आत्महत्या करणे ही प्रवृत्ती आजच्या तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणात फोफावत आहे. तू माझी नाही तर, कुणाचीच नाही किंवा तू माझा नाही तर, कोणाचाही नाही.. ही भावना तरुणांमध्ये  बळावत आहे आणि यातूनच हिंसक प्रकार समोर येत आहे.

भारतात प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, दरवर्षी सरासरी २७५ हून अधिक पतींची हत्या त्यांच्याच पत्नीकडूनकिंवा प्रियकरासोबतच्या अनैतिक संबंधातून प्रियकरासाठी नवऱ्याची हत्या भारतात या घटनांमध्ये वाढ  होत आहे.

एका अहवालानुसार, ५ वर्षांत भारतात ७८५ हून अधिक पतींची हत्या त्यांच्या पत्नींनी किंवा त्यांच्या प्रियकरांनी केल्याचे उघड झाले आहे. यामध्ये उत्तर प्रदेश अव्वल स्थानावर असून त्यानंतर बिहार, राजस्थान, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या राज्यांचा क्रमांक लागतो.पती हा अनैतिक संबंधांमध्ये किंवा विवाहबाह्य अफेअरमध्ये मोठा अडसर वाटत असल्याने, पत्नी प्रियकराच्या साथीने हत्येचा कट रचतात.प्रियकरासाठी किंवा विवाहबाह्य संबंधांमधून पती किंवा होणाऱ्या पतीची हत्या करण्याच्या घटनांमध्ये अलिकडे वाढ झाली असून, असे गुन्हे चिंताजनक बनले आहेत.

होणाऱ्या नवऱ्याशी लग्न न करता त्याच्याशी असलेल्या विवाहाला विरोध करण्यासाठी, एका तरुणीने आपल्या प्रियकराच्या मदतीने भावी पतीला लोहगड किल्ल्यावरून दरीत ढकलून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. नालासोपारा (पालघर) प्रकरण: एका महिलेने प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या करून पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह घरातच फरशीखाली पुरल्याचे उघडकीस आले होते.

राजस्थानमध्ये घडलेली घटना गेल्या वर्षी मेघालयात घडलेल्या एका हत्येसारखी आहे. मेघालयमध्ये राजा आणि सोनम रघुवंशी हे जोडपे हनिमूनला गेले होते. काही दिवसांनी पती राजा रघुवंशी मेघालयाच्या जंगलात मृतावस्थेत आढळला. तपासात असे समोर आले की, सोनमने तिचा प्रियकर राज कुशवाह याच्याबरोबर पतीची हत्या करण्याचा बेत आखला होता. त्यांनी हनिमूनदरम्यान राजाला मारण्याचे ठरवले आणि त्याला अपघाताचे स्वरूप दिले.

मेरठमधील अशाच एका घटनेत सौरभ राजपूतचे तुकडे करून ते निळ्या प्लास्टिकच्या ड्रममध्ये भरून सिमेंटमध्ये गाडले गेले. मुख्य म्हणजे त्याची पत्नी आणि तिचा प्रियकर हे सगळं घडताना तिथे उपस्थित होते. बिजनौरमध्ये एका व्यक्तीचा गळा दाबून त्याला मारण्यात आले. या प्रकरणातही पत्नीच्या प्रियकराने पतीची हत्या केली. अशा अनेक घटना गेल्या काही काळात घडल्या आहेत. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या (एनसीआरबी) २०२२ च्या अहवालानुसार, भारतात २०२२ मध्ये झालेल्या हत्येच्या कारणांमध्ये 'प्रेमसंबंध' हे तिसरे सर्वात मोठे कारण होते. अहवालानुसार, त्या वर्षी हत्येच्या प्रकरणांमागे पहिले कारण वाद, तर दुसरे कारण वैयक्तिक वैर होते.

लग्नानंतर किंवा लग्नाआधी दुसऱ्या व्यक्तीसोबत झालेले प्रेमसंबंध आणि जुन्या नात्याला संपवण्यासाठी टोकाचे पाऊल उचलत ह्या करणे  असा प्रकार सर्रास वाढला आहे.सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे तात्काळ निर्णय घेणे, सहिष्णुतेचा अभाव आणि गुन्हेगारीकडे सहज आकर्षित होणे, यामुळे तरुणांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती मोठ्या प्रमाणावर वाढत चालली आहे.समोरील व्यक्ती मार्गातून हटवल्यास सर्व प्रश्न सुटतील या गैरसमजातून पूर्वनियोजित कट रचून हत्येसारखे गंभीर गुन्हे केले जातात. करिअर, शिक्षण आणि कौटुंबिक अपेक्षांचे ओझे सहन न झाल्यामुळे तरुण मानसिक तणावाखाली येतात. प्रेमसंबंधात अपयश किंवा कौटुंबिक कलह यातून टोकाचे राग अनावर होऊन हत्या किंवा स्वतःचे जीवन संपवण्याच्या घटना घडतात. अमली पदार्थ आणि मद्यपानामुळे तरुणांची विचार करण्याची व निर्णय घेण्याची क्षमता नष्ट होते.सहनशीलता कमी होणे आणि क्षुल्लक कारणांवरून वाद विकोपाला जाणे.या व अशा अनेक कारणांमुळे तरुण पीढी हिंसक पाऊल उचलत आहे.

यामागे कौटुंबिक कलह, व्यसनाधीनता, हिंसक व्हिडिओ गेम्स, सोशल मीडियाचा अतिवापर आणि मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष ही प्रमुख कारणे आहेत. या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन वेळीच योग्य पावले उचलणे गरजेचे आहे.

उपाय आणि प्रतिबं धसंवाद वाढवणे: पालकांनी आणि मित्रांनी तरुणांशी मनमोकळा संवाद साधणे गरजेचे आहे.मानसिक आरोग्याकडे लक्ष: नैराश्य किंवा नैराश्याची लक्षणे दिसल्यास मानसोपचारतज्ज्ञांची मदत घ्यावी.नकारात्मक गोष्टींपासून दूर राहणे: अमली पदार्थ आणि हिंसक माध्यमांपासून तरुणांना दूर ठेवणे आवश्यक आहे.काउन्सिलिंग सेंटर्स: शाळा आणि महाविद्यालयांमध्ये समुपदेशन केंद्र  असणे अनिवार्य असावे.

# करमाळा आयटीआयला मदनदास देवी यांचे नाव

ज्योतिर्मय साहित्य

करमाळा – करमाळा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला (आयटीआय) राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सह–सरकार्यवाह आणि थोर समाजसेवक कै. मदनदास देवी यांचे नाव देण्यात येणार आहे. या नामकरणानिमित्त येत्या मंगळवारी, ३० जून २०२६ रोजी सकाळी ठीक साडेनऊ वाजता संस्थेच्या प्रांगणात एका विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे (अभाविप) प्रदेशाध्यक्ष डॉ. शांतिनाथ बगवेवाडी आणि प्रदेश मंत्री अथर्व कुलकर्णी यांनी माहिती दिली.

कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार असून, ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील. तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा उपस्थित राहणार आहेत.

– करमाळ्याचे सुपुत्र आणि कुशल संघटक

मूळचे करमाळा (जि. सोलापूर) येथील असलेल्या मदनदासजी देवी यांचे राष्ट्रीय स्तरावरील सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील योगदान अतुलनीय राहिले आहे. त्यांनी एम.कॉम., एलएल.बी. आणि चार्टर्ड अकाउंटंट असे उच्च शिक्षण पूर्ण केले होते. १९६९ मध्ये त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ प्रचारक म्हणून स्वतःला राष्ट्रकार्यासाठी



समर्पित केले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या भक्कम उभारणीत, वैचारिक मांडणीत आणि देशव्यापी विस्तारात मदनदासजींचा सिंहाचा वाटा होता. त्यानंतर त्यांनी संघाचे अखिल भारतीय सह–सरकार्यवाह म्हणून दीर्घकाळ जबाबदारी सांभाळली.

– संघ–भाजपमधील समन्वयाचा मुख्य दुवा

अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारच्या कार्यकाळात मदनदासजी यांनी संघ आणि भाजपमधील मुख्य समन्वयक (दुवा) म्हणून अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली होती. अत्यंत गुंतागुंतीच्या राजकीय परिस्थितीतही सरकार आणि संघ परिवार यांच्यात योग्य ताळमेळ राखण्याचे काम त्यांनी पडद्यामागून अतिशय मुत्सद्दीपणे केले. अत्यंत साधी राहणी, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि माणसांची अचूक पारख हे त्यांचे वैशिष्ट्य होते. आज राष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यासह अनेक दिग्गजांना सुरुवातीच्या काळात ओळखण्यात आणि त्यांचे नेतृत्व घडवण्यात मदनदासजींचे मोलाचे योगदान राहिले आहे.

त्यांच्या या राष्ट्रकार्याचा आणि स्थानिक भूमीशी असलेल्या नात्याचा गौरव म्हणून करमाळा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला त्यांचे नाव देण्यात येत आहे. शासनाच्या या निर्णयामुळे करमाळा परिसरासह राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिक वर्तुळातून तीव्र आनंद व्यक्त होत आहे. ३० जून रोजी होणाऱ्या या सोहळ्याला नागरिक, विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.


# मानवतावादी कुशल राजे– राजर्षी शाहू महाराज

ज्योतिर्मय साहित्य

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना तुम्ही ज्ञानाचे राजे आहोत. आम्ही वंशपरंपरेने आलेले राजा आहोत. अशा शब्दात राजर्षी शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विद्वत्तेचा गौरव केला होता. त्यांना मनाची श्रीमंती मानली होती. ते मोठ्या दिलाचे राजे होते ज्या काळात मनुष्याचा विटाळ होतो म्हणून त्यांना सार्वजनिक ठिकाणी पाणी पिऊ देण्यास मज्जाव केला जात असे. अशा काळात राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यांना व दलितांना सार्वजनिक विहिरी व पाणी पिण्याचे पाणवठे खुले करून दिले. कोल्हापूर संस्थानामध्ये सर्वांना समानतेची वागणूक देणारे एकमेव महान समाजसुधारक मानवतावादी कुशल व प्रभावी राजे होते होते.



महाराष्ट्रात कोणत्याही कार्याची सुरुवात करायची असेल तर छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराज यांचे नाव घेणे अगत्याचे आहे. आज त्यांची जयंती त्यानिमित्ताने त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा थोडक्यात येथे करून घेत आहोत.. ते प्रजाहीतदक्ष संस्थानिक राजे होते. सामाजिक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या समाजात त्यांनी जाणीव जागृती निर्माण करून दिली. त्यांच्या प्रयत्नांनी व उपक्रमांनी सामाजिक व शैक्षणिक परिवर्तन झाले. महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात त्यांचे नाव अग्रस्थानी घ्यावेच लागते.




ते ब्रिटिशांच्या राजवटीतील कुशल संस्थानिक होते. त्यांनी सर्व समाजावर दूरगामी परिणाम घडवून आणले. त्यामुळे त्यांचे नाव अजरामर  झाले ;ते फक्त संस्थानाधिपती म्हणून मोठे ठरले नाहीत. राजसत्तेला सामान्य जनतेच्या कळवळ्याचे लेणे चढले होते. त्यांचा काळ हा समानतेचा काळ होता. ते समानतेचे पुरस्कर्ते होते. कोल्हापूर संस्थानात त्यांनी व्यापार, उद्योग, विद्या ,कला या क्षेत्रामध्ये नवे चैतन्य निर्माण केले. स्वतःचा बडेजाव बाजूला ठेवला. आपल्या राज्यात गुणवंत लोक तयार व्हावेत, म्हणून त्यांनी वेगवेगळ्या कला कोल्हापूर संस्थानांमध्ये विकसित केल्या. गुणवान, अनाथ लोकांना त्यांचा फार मोठा आधार त्या काळात झाला होता. त्यांनी घडवलेल्या सामाजिक परिवर्तनाचे रहस्य आज सुद्धा लोकांना उलघडत नाही. त्यांचे मन मोठे होते. म्हणून त्यांना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव बळवंतराव चव्हाण म्हणतात. राजर्षी शाहू महाराज हे मोठ्या दिलाचे राजे होते. यामध्ये त्यांच्या कार्याची उंची कळते.


मानवतावाद त्यांनी सर्वसामान्य व्यक्तीला शिकवला. समाजाचे आपण काही तरी देणे लागतो म्हणून त्यांनी समाजात समानता निर्माण केली. त्यांची दृष्टी शास्त्रशुद्ध आणि आधुनिक होती. जुना परंपरा, अंधश्रद्धा,भानामती, वेडगळ समजूती, जादूटोणा, छू मंतर यावर त्यांचा विश्वास नव्हता. समाज शिकावा आणि मोठा व्हावा; त्यांच्या मनामध्ये शिक्षणाची बीजे रोवली जावी. हा त्यांचा कटाक्ष होता. त्यांनी कधीही अस्पृश्यता पाळली नाही.


जे का रंजले गांजले । त्याशी म्हणे जो आपले । तोचि साधू ओळखावा ।देव तेथेची जाणावा।।

या उक्तीप्रमाणे त्यांनी समाजातील सर्व थरातील विद्यार्थ्यांना बोर्डिंगची सोय करून दिली. विद्येचा लाभ मिळवून दिला. सामाजिक प्रतिष्ठा वाढवली. अस्पृश्यतेचा कलंक धुऊन टाकला. महार वतने बंद करून टाकली. रामोशी समाजाला संरक्षण दिले. आपल्यासोबत नेहमी मागासवर्गीय लोक कसे राहतील यासाठी त्यांनी आपला चाबुकस्वार, मोटरचा ड्रायव्हर, माहूत यांना सोबत ठेवले. दलित समाज हा सामाजिक दृष्ट्या बरोबर आर्थिक दृष्ट्या ही प्रगल्भ झाला पाहिजे.

अशी त्यांचे स्पष्ट मत होते. कामगार, शेतकरी, कष्टकरी, मजूर यांना त्यांनी संघटित केले. इंग्लंडमध्ये मजूर संघटित झाले. त्याचे प्रतिनिधित्व पार्लमेंट मध्ये बसू लागले. त्यामुळे मजुराची स्थिती सुधारली हे त्यांनी सर्वांना सांगितले दिखाऊ कार्यापेक्षा चिरस्थायी व कल्याणकारी कार्याला ते नेहमी प्राधान्य देत असत. भोगावती नदीवर राधानगरी धरणाची कल्पना त्यांना सुचली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न बराच मिटला. सहकारी चळवळीचा आणि शेतकऱ्यांच्या संघटनेचा उपक्रम त्यांनी सुरू केला. दलाला कडून होणारी पिळवणूक थांबवली. सामान्य जनतेला महाराजांनी आधार दिला. त्यामुळे सर्वांचा पुरुषार्थ जागा झाला. लोक जीवनाला त्यांनी नाट्य, संगीत, क्रीडा इत्यादी कलांची जोड दिली. मल्लविद्येला प्रोत्साहन दिले.  गुणी लोकांना एकत्रित जमवण्याची महाराजांना फार हौस होती. असे इतिहासकार रियासतकार सरदेसाई म्हणतात. २६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानांमध्ये त्यांनी तळागाळातील लोकांना ५०% आरक्षण घोषित केले. म्हणून त्यांना समतेचे पुरस्कर्ते असेही म्हणतात. त्यांचा जन्मदिन सामाजिक न्याय हक्क दिन म्हणून ही साजरा केला जातो. आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाहाला त्यांनी मान्यता दिली. तळागाळातील लोकांना राजर्षी शाहु महाराजांचा फार मोठा आधार होता. गांजलेल्यांना, पीडीतांना ते एखाद्या कोर्टासारखे वाटायचे. खरोखरच त्यांनी लोकांना मनाभावातून आधार दिला. चुंबकाकडे लोखंडाचे कण जसे धाव घेतात, त्याचप्रमाणे लोक राजर्षी शाहू महाराजा कडे धाव घेत असत. म्हणून राजर्षी शाहू महाराज हे केवळ वारसा हक्काने राजे नव्हते. तर ते सर्वसामान्य लोकांचे राजे होते. अस्पृश्यतेचा कलंक घालवण्यासाठी आयुष्यभर त्यांनी कार्य केले. नागपूर येथील कृमी सभेने त्यांना राजर्षी हा किताब दिला.त्यामुळेच ते इतिहासा मध्ये अजरामर झाले. त्यांच्या या सामाजिक, शैक्षणिक कार्याला विठू माऊली प्रतिष्ठानच्या वतीने मानाचा मुजरा. व त्यांना विनम्र अभिवादन..

***



## जात्यावरच्या ओव्या......

अरे पड ना पाण्या
विहिरि आटून गेल्यात
कुठ धाडु सांगावा?
पाणी नाही रे पेल्यात ||७११||

अरे पड ना पाण्या
पाणी वापरते तुपावाणी
तुला करते विनवणी
पड, कर आबादाणी ||७१२||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ४३

ज्योतिर्मय साहित्य


**मना सज्जना एक जीवी धरावे।**
**जनी आपुले हीत तुवा करावे।**
**रघुनायकावीण बोलो नको हो ।**
**सदा मानसी तो निजध्यास राहो।४३।**

अर्थ : हे सज्जन मना, आपल्या जीवाशी एक खूणगाठ बांधून ठेव. जीवनामध्ये आपले तू कल्याण करून घे. एकदा भगवंताशिवाय अन्य गोष्टी बोलण्याचे सोडून दे. सदासर्वदा आपल्या मनाला त्याचाच ध्यास लागू दे.

विवेचन : आपले कल्याण व्हावे ही समर्थांची तळमळ मनाच्या श्लोकांमध्ये ठायी ठायी जाणवते. म्हणून पुनरुक्तीचा दोष पत्करून काही गोष्टी ते पुन्हा पुन्हा सांगतात. आपल्या मनाला उपदेश करताना ते म्हणतात,'' हे सज्जन मना, एक गोष्ट आपल्या जीवाशी निश्चित करून ठेव. तुला जर तुझे कल्याण करून घ्यायचे असेल तर रघुनायकाचा म्हणजे भगवंताचा ध्यास घे. त्याच्याशिवाय दुसरे काही बोलू नको.''




व्यवहारात आपल्या वाणीला म्हणजे बोलण्याला अतिशय महत्त्व असते. आपल्या बोलण्यावरून आपले व्यक्तिमत्व लोकांना समजते. म्हणून व्यवहारात लोकांशी आवश्यक तेवढे बोलावेच लागेल. व्यवहार सोडता येणार नाही. समर्थांनी देखील ''आधी प्रपंच करावा नेटका'' असे सांगितले आहे. पण जेव्हा व्यवहारातील बोलणे संपेल तेव्हा आपल्या मुखातून भगवंताचे नामच बाहेर पडले पाहिजे. असे नाम सातत्याने येण्यासाठी मनामध्ये त्याचा विचार हवा कारण जसा विचार, तसा उच्चार आणि तसा आचारही होतो.




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

हा झाला बाह्य आचार. एक वेळ मुखात भगवंताचे नाम येणे, भगवंताबद्दल बोलणे सहज जमू शकते. पण आपल्या अंतरंगात भगवंताचे अनुसंधान टिकवणे सोपे नाही. त्याच्यासाठी सतत जागेपणी जेवढे शक्य होईल तेवढे भगवंताचे नाव घेत राहण्याचा अभ्यास करायला हवा. इंग्रजी शब्दांचा वापर करून सांगायचे झाले तर ट्वेंटी फोर बाय सेव्हन भगवंताच्या नामाचा ध्यास असायला हवा. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज म्हणतात तुम्ही जागेपणी मनाला नाम घेण्याची सतत सवय लावून घ्या. एकदा हे साधले की मग तुमच्या झोपेत किंवा तुमच्या आजारपणात देखील आपोआप हे नाम घेतले जाईल. हे विवेचन वाचत असताना आपल्याला असे वाटेल की हे म्हणजे फारच झाले व्यवहारात आपल्याला एवढे शक्य नाही. परंतु समर्थांचे हे सांगणे आपल्यासारख्या सर्वसामान्यांसाठीच आहे. आपण भगवंताचे नाम का घ्यायचे ?त्याची भक्ती का करायची ? तर आपण साधना मार्गावर चालणारे साधक आहोत. सुरुवातीलाच समर्थांनी आपल्याला ''गमू पंथ अनंत या राघवाचा'' असे सांगितले आहे. ही गोष्ट एकदा मान्य केली की मग समर्थांचा उपदेश सहज पचनी पडतो. **(क्रमशः)**




## || अभंग-माधव ||




माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



### नारळ अन् मानव

बाह्य रूपावरी | भुलू नका कधी |
जाणा तुम्ही आधी | अंतरंग ||१||
बाह्यरूपी छान | नारळ,मानव |
अंतरीचा ठाव | समजेना ||२||
खरे दिसे रूप | नारळ फोडता |
माणूस जोडता | सत्य कळे ||३||
माधव हा म्हणे | सुखी होण्या जगी |
अंतरंग आधी | पारखावे ||४||

## साधन निष्कामबुद्धीने आणि सावधानपणे करावे.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

भगवंतापासून जो निराळा राहात नाही तो मुक्तच. ' मी भगवंताचा' म्हटले की तिथे बद्धपणा संपला. ' मी ' नसून 'तो ' आहे हे जाणणे म्हणजे मुक्तता प्राप्त करून घेणे. देहात असून देहातीत राहातो तो मुक्त. ' राम कर्ता ' हे जाणतो तो मुक्त. ' माझे, माझे ' असे म्हणून आपण बद्धावस्था लावून घेतो, बद्धाचे आवरण काढून टाकले की आपण मुक्तच आहोत. माझ्या मनावर कशाचाही परिणाम झाला नाही आणि समाधान कायम राहिले, की मुक्तावस्था. ' माझ्यासारखा पापी मीच ' असे आपण मनानेच ठरवतो आणि दु:ख करीत बसतो. मी एक भगवंताचाच झालो, आता नाही कोणाचा, असे म्हणावे आणि जगात नटासारखे वागावे. वास्तविक, आपण मायेकडून पछाडले गेलो आहोत. भगवंताजवळ माया ही छायेप्रमाणे आहे. आपण मायेचा नियंता जो भगवंत, त्याचे होऊन राहावे; मग माया खरी नाही हे समजते. मायेला ओळखणे म्हणजे विवेक आणि भगवंत ठेवील त्यात समाधान मानणे, हे वैराग्य.

पापपुण्य हे मनाचे धर्म आहेत. मी आता नाम घेतो, माझी सर्व पापे त्यामुळे नाहीशी झाली आहेत अशी दृढ भावना झाली की तो निष्पाप झाला म्हणून समजावे. चारचौघे करतात म्हणून साधन करून नाही चालणार. साधनात दृढ भाव पाहिजे. साधन करायचे ते योग्य मार्गाने झाले पाहिजे. ते अगदी निष्काम असावे. बुद्धिभेद करणारे लोक जगात नेहमी असणारच; पण साधकाने आपला बुद्धिभेद होत नाही इकडे जागृत असावे. काही पुरुष किंवा स्त्रिया यांना आपला स्वत:चा असा काही प्रपंच राहिलेला नसतो, तरीही हे लोक उगीचच जगाचे दोष काढीत बसतात; दुसऱ्यांच्या घरी जाऊन उठाठेव करतात; हे फार मोठे पाप आहे. साधकाने ते कटाक्षाने टाळावे. ज्या लोकांना आपल्यामध्ये दोष आहेत हे कळतच नाही, ते लोक अगदी खालचे समजावेत; ज्यांना आपला दोष कळतो ते दुसऱ्या प्रतीचे समजावेत; आपण प्रयत्न करूनसुद्धा भगवंताच्या आड येणारा दोष जात नाही म्हणून तळमळ असणारे लोक हे सर्वांत चांगले; साधकाने तसे बनले पाहिजे. परमार्थामध्ये अर्ध्यापर्यंत गेल्यावर, मग पुढे जाणारे साधक फार थोडे असतात. खरे म्हटले म्हणजे साधन आणि वाचन असले की साधक कधी मागे पडायचा नाही. ब्रह्मचारी साधकाने प्रपंचातल्या उठाठेवी करू नयेत, कारण तशाने प्रपंचाचे प्रेम त्याला लागेल. त्याने प्रपंचापासून चार पावले दूर राहावे, नाही तर तोच हवा असे वाटू लागते. जगात किती पोथ्या आणि किती मते आहेत ! एवढे पाहायला वेळ कुठे आहे ? म्हणून साधकाने गीता, ज्ञानेश्वरी, गाथा, भागवत किंवा दासबोध असा एक ग्रंथ प्रमाण मानून त्याप्रमाणे साधन करावे.

मुंगी डोंगरावर चढण्याचा प्रयत्न करते आणि कालांतराने का होईना पण वर पोहोचल्याशिवाय राहात नाही, हे ध्यानात घेऊन आपण प्रयत्नाला लागू या.

****

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

### मरणाची भिती राहू नये

आपण या देहात एक नाटक करायला आलो आहोत. हे नाटक संपले, आता आपण पुन्हा कदाचित दुसऱ्या नाटकासाठी सिद्ध व्हायला जाणार आहोत, ही भावना ठेवली तर देहाची आसक्ती कमी होईल. हो.. मी मृत्यूला तयार आहे, ही भावना ठेवणे, व येणारा प्रत्येक क्षण प्रभू भक्तीत घालवणे हे आपले कर्तव्य ठरते. मृत्यू येणार आहे तर तो विनासायास यावा. अगदी सहजगत्या यावा. त्याच्या येण्याला विरोध नाही, तर तो पिडा न देता त्याने अलगद घेऊन जावे. हा भाव आपण परमेश्वराला मागायला हरकत नाही.
विणा दैन्येन जीवनम्
साई इतना दीजिए, जामे कुटुंब समाए/
मै भी भुंका ना रहू /साधून् भुंका जाए//
आपल्याला प्रपंचाला किती लागते, याचा हिशोब व अंतही नाही झोपडीत राहणारा गरिबाला एक वेळचे जेवण मिळाले तरी तृप्त असतो व गर्भ श्रीमंत माणूसही मला आणखी का नाही मिळाले? म्हणून रडत असतो. आपण आपल्या अपेक्षा ह्या मर्यादित ठेवणे गरजेचे असते. अपेक्षा भंगातूनच दु:ख जन्म घेत घेते. संन्यास याची व्याख्याच मुळी कमीत कमी गरजा असणे म्हणजे संन्यास, अशी आहे. त्यामुळे आपला चरितार्थ चालावा त्यात फारशी दैण्यावस्था राहू नये, कारण खूप दैन्य असले तर माणूस त्या आर्थिक समस्या सोडविण्यातच वेळ खर्च करील. त्यामुळेच तो दु:खी होईल व प्रभू भक्ती विसरेल. क्रमश:....

## सुख दु:खाचे तरंग माणसा-माणसाचे



✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### योग वृद्धाचा सोबती

भारतात तरूण आणि वृद्ध म्हणजे वयस्कर लोक आणि त्यांची संख्या भरपूर आहे. तरूण अजून जगणार आणि कार्य करून दाखवणार पण वृद्ध आपली तबियत, फिट-ठेवण्यासाठी काय करतात,
तर त्यांना साथ देणारा म्हणजे योग होय. आरोग्य व अवयवाच्या तक्रारी व विशेष म्हणजे "एकटेपणा" वाढतो...
आपल्या भारतातही ही जेष्ठ
लोकांची समस्या वाढून त्यांना सेवा देण्यासाठी कर्मचारी कमी पडतात. यावर सर्व देश ऊपाय शोधत आहे! या कामासाठी प्रगत देशात रोबोट आहेत. या सेवावर पुढे जास्त ताण येईल...
म्हणून आपल्याकडे पुर्वीपासून ऋषीनी सांगितले की योगा करा, म्हणून योगा वाढवून त्याचे सातत्याने आचरण करणे हितकर आहे. आपल्याकडे अनेक योगशिक्षिक गुरू फार मोठे काम करत आहे.
महत्त्वाचे म्हणजे योगप्राणायम आसने यामुळे शरीर व आत्मा वेगवेगळे होतात तब्येत चांगली राहते, शांतीची अनुभूती होते, एकटेपणा निघून जातो, म्हणून डू योगा स्टे फीट, हेल्दी व ईन्जाय लाईफ.. गूड़ डे गुड मार्निंग स्वस्थ राहा मस्त राहा.




## पुजेसाठीचा कापूर - बहुगुणी, प्रभावी आणि आयुर्वेदिक उपचारांचा राजा

ज्योतिर्मय साहित्य

कापूर फक्त पूजेसाठी पवित्र नसून, शरीरातील अनेक समस्या काही दिवसांत दूर करणारा नैसर्गिक उपाय आहे!

- कापूर घरातील नकारात्मकता दूर करतो
- शरीर-मन शांत ठेवण्याची अद्भुत क्षमता
- अँटी-बॅक्टेरियल, औषधी आणि त्वरित परिणाम करणारा घटक

चला जाणून घेऊ या अद्भुत फायदे

१) तणाव दूर करतो : कापराचा सुगंध मन शांत करतो. खोलीत कापूर ठेवला तर - तणाव कमी, मन प्रसन्न, रात्री उत्तम झोप

२) डोकेदुखीवर प्रभावी : कापूर + सुंठ + अर्जुनाची साल + पांढरं चंदन एकत्र बारीक करून कपाळावर लावा.

थोड्याच वेळात आराम जाणवेल!

३) स्नायू वेदना व खोकला आराम - मोहरी किंवा तिळाच्या तेलात कापूर टाकून मालिश करा.

- स्नायूंच्या वेदना कमी होतात, खोकल्यावर झटपट आराम

४) सर्दी-जंतुसंसर्गावर उपयोगी - गरम पाण्यात कापूर टाकून वाफ घेतल्याने सर्दी लगेच कमी होते.



संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

५) त्वचेसाठी उपयुक्त खोबरेल तेल + कापूर

- डाग कमी - त्वचा स्वच्छ

(तेलकट त्वचेसाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्या)

६) केस काळे व कोंड्यामुक्त : कापूर मिसळलेले तेल लावल्याने कोंडा कमी होतो व केस काळे राहतात.

७) हिवाळ्यात टाचांच्या भेगांसाठी - कोमट पाणी + कापूर पाय काही वेळ भिजवा पाय मऊ होतात भेगा बऱ्या होतात.

***

## प्रभातपुष्प



षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### तुळस

अतिथींचे स्वागत करण्या
अंगणात उभी तुळस
सकलांची असे माता
सांज सकाळी होते
नित्यनियमाने पूजा तिची
शुध्द प्राणवायूची दाता

मांगल्याचे सुंदर प्रतिक
असे तुळस माता
पूजा तिची करुया
धूप दिप लावूनी
नमन तिला करत
निरोगी आरोग्य मागूया

# एमआयटी पॉलिटेक्निकची उज्वल निकालाची परंपरा कायम

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने घेतलेल्या उन्हाळी - २०२६ च्या परिक्षांचा निकाल नुकताच जाहिर झाला असून या निकालामध्ये एमआयटी पॉलीटेक्नीकच्या विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान यश मिळवून महाविद्यालयाच्या उज्वल निकालाची परंपरा याही परिक्षेत कायम राखली आहे.

महाविद्यालयातील सर्वच अभ्यासक्रमाचे निकाल उत्कृष्ट लागले असून इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाचा निकाल ९७.६१% असा सर्वोत्कृष्ट असून त्याखालोखाल आर्टीफिशीयल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग विभाग (९५.४२%) , कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग ( ९१.३३% ), इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग विभाग ( ८५% ) सिव्हील इंजिनिअरिंग विभाग (७९.५४%) व मेकॅनिकल इंजिनिअरींग विभाग (७३.५२%) यांचा क्रमांक लागतो.

अंतिम वर्ष कॉम्प्युटर अभियांत्रीकीची विद्यार्थिनी चंचल पोटे (९४.५२%) गुण घेऊन कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातून आणि महाविद्यालयातुन सर्वप्रथम आली आहे , या विभागात प्रेम रणमाळे ( ९४.१७%) आणि ऋषिकेश पाटील (९४.०५%) अनुक्रमे द्वितीय आणि तृतिय आले आहेत, इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाच्या अंतिम वर्षाचा पूजा खरात ही विद्यार्थींनी (८९.८९%) टक्के गुण घेऊन सर्वप्रथम आली आहे, शेख मिन्हा (८७.६०%) द्वितीय तर अंकिता शिंदे (८६.८०%) गुणांसहीत तृतिय आली आहे. सिव्हील इंजिनिअरिंग विभागात प्रथम येण्याचा मान कार्तिक बखले (९१.११%) याने मिळविला असून , अपूर्वा निकम(८७.२८%) व हर्षदा वाघ (८४.४४%) हे अनुक्रमे द्वितीय आणि तृतिय आले आहेत. इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग विभागामधे (८९.७२%) गुण घेऊन समर्थ भालेकर पहिला, अनुजा शिसोदे(८९.६१%) दुसरी आणि भावेश बैरागी (८८.९४%) तिसरा आला आहे.

आर्टिफिशियल इंटेलीजन्स अँड मशीन लर्निंग या अभ्यासक्रमामधून ज्ञानमंजिरी साळुंके (९२.७१%) गुण घेऊन सर्वप्रथम, करुणा शर्मा (९२.५९ %) द्वितीय तर जीवन दाभाडे (९१.२९%) तृतीय आले आहेत. मेकॅनिकल इंजिनिअरींग मधून वरद कणसे ह्या विध्यार्थ्यांने (८८.०६%) गुणांसहीत प्रथम क्रमांक मिळविला असून शेख इफ्राजूद्दीन द्वितीय आणि शेख अयान तृतिय आले आहेत.

महाविद्यालयाच्या प्रथम व द्वितीय वर्षातील विविध अभ्यासक्रमातील विध्यार्थ्यांनी सुद्धा भरघोस यश मिळविले असून, द्वितीय वर्ष संगणक अभियांत्रिकीचा विद्यार्थी खान अमीन अली याने (९१.३५%) गुण घेत पहिला क्रमांक मिळविला असून त्याच वर्गाची सिद्धी गहलोद (९०.३४%) गुण घेत द्वितीय कमांकाची मानकरी ठरली आहे , या वर्गाची रुपल जोशी



(९०.१७% ) तृतीय आली आहे. द्वितीय वर्ष आर्टिफिशियल इंटेलिजन्स अभ्यासक्रमामधे ऋतुजा रोडे ही विद्यार्थीनी (८८.४०%) घेऊन प्रथम आली आहे, प्रगती वाघ व जयश्री शेजुळ या अनुक्रमे द्वितीय व तृतीय आल्या आहेत , वेदिका सुंब (८८.८९%) ही द्वितीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंगमधे पहिली आली आहे. या अभ्यासक्रमातुन रूद्र देशमुख द्वितीय व धीरज मंझा तृतीय आले आहेत. आर्यन खारोटे,

प्रतिक्षा गोजे आणि अभिषेक जाधव हे विद्यार्थी सिव्हील इंजिनिअरिंग मधे अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय आले आहेत. आदित्य तौर , आदित्य काळे व वेदिका सरोवर हे द्वितीय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंग मधे , नम्रता मुळे, शुभांगी खाडे व प्रद्युम्न पवार मेकॅट्रॉनिक्स मधे तर ओम ज्ञाने, ऋषिकेश तांबे व यश शिंदे हे इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगमधे गुणवंत ठरले आहेत.

प्रथम वर्षामधून शेख मुस्तकीम - संगणक अभियांत्रिकी , प्राजक्ता वीर- आर्टिफिशियल इटंलीजन्स अँड मशीन लर्निंग , संस्कृती भुसारी- इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी, श्रावणी मेनकुदळे - मेकॅनिकल अभियांत्रिकी, शिवांजली वेताळ- इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कॉम्प्युटर अभियांत्रिकी , रुतुजा भोगले - मेकॅट्रानिक्स तर क्रितिका जोगदंडे - सिव्हील अभियांत्रिकी मधून प्रथम आले आहेत.

महाविद्यालयातील सर्वच अभ्यासक्रमाच्या तिनही वर्षाचे निकाल सर्वोत्कृष्ठ लागले असून , महाविद्यालयातील प्रथम वर्षाच्या एकुण १९ विद्यार्थ्यांनी (कॉम्प्युटर इंजिनिअरिंग-१३, आर्टिफिशियल इंटेलिजन्स-०४ , इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग-०२ ) अप्लाईड मॅथेमॅटीक्स विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले , सी प्रोग्रामिंग मधे ०३ विद्यार्थ्यांना १०० गुण मिळाले आहेत तर डाटा वेअरहाउसिंग अँड मायनिंग टेक्निक या विषयामधे सुद्धा ०३ विद्यार्थ्यांनी १०० गुण मिळवले आहेत. मेन्टेनन्स ऑफ इलेक्ट्रिकल इक्विपमेंट या विषयात सुद्धा एका विद्यार्थ्याला १०० गुण प्राप्त झाले आहेत.

इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगचे (वर्किंग प्रोफेशनल) वैभव हरिदास व लखन पवार अनुक्रमे द्वितीय व प्रथम वर्षामधून गुणानुक्रमे पहिले आले आहेत.

एमआयटी पॉलिटेक्निकच्या उत्तम निकालाची परंपरा यावर्षी सुद्धा विद्यार्थ्यांनी कायम राखली आहे.

सर्व गुणवंत आणि यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉ वाय ए कवडे, एमआयटीचे महासंचालक प्रा. मुनिश शर्मा, कार्यकारी अध्यक्ष प्रा भूपेश मिश्रा, संचालक प्रा.बी.एम. देशमुख, डॉ शकुंतला लोमटे, प्रा शितल देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल देशमुख, सर्व विभागप्रमुख आणि प्राध्यापक वृंदाने केले आहे.

## देशात सर्वात तरुण कृषी भूषण युवा शेतकरी ठरण्याचा बहुमान कन्नडच्या सुपुत्राला !

### ताडपिंपळगावचे सागर सोनवणे यांना राज्य शासनाचा सर्वोच्च कृषी पुरस्कार जाहीर लंडनची संधी नाकारून मायभूमीत कृषी क्रांती

ज्योतिर्मय साहित्य



कन्नड : ''ध्येय जर प्रामाणिक असेल आणि त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली, तर मातीतूनही सुवर्ण यश पिकवता येते,'' हे ताडपिंपळगाव (ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) येथील एका तरुण कृषी पदवीधराने सिद्ध केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत दिला जाणारा अत्यंत प्रतिष्ठेचा कृषी भूषण युवा शेतकरी पुरस्कार ताडपिंपळगावचे प्रयोगशील शेतकरी सागर राजेंद्र सोनवणे यांना जाहीर झाला आहे. कृषी क्षेत्रातील जाणकार आणि विविध राष्ट्रीय रेकॉर्ड्र्सच्या आकडेवारीनुसार, वयाच्या इतक्या कमी टप्प्यावर हा सर्वोच्च राज्यस्तरीय कृषी पुरस्कार मिळवणारे सागर सोनावणे हे बहुदा भारतातील सर्वात तरुण कृषी पदवीधर शेतकरी ठरले आहेत.

लंडनची मोठी संधी नाकारली

सागर सोनवणे यांनी आपले बी.एस्सी. ॲग्रीकल्चर चे उच्च शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमुळे त्यांची युनायटेड किंगडम मधील एका नामांकित विद्यापीठात एम.एस्सी. साठी निवड झाली होती. परदेशात जाऊन लाखो रुपयांचे पॅकेज मिळवण्याची सुवर्णसंधी समोर असतानाही, त्यांनी परदेशी सुखापेक्षा मायभूमीत राहून ॲग्रो-फार्मा आणि शाश्वत शेती क्षेत्रात काहीतरी करून दाखवण्याचा धाडसी निर्णय घेतला आणि ती संधी नाकारून पूर्णवेळ शेती क्षेत्रात स्वतःला झोकून दिले.

कृषि क्षेत्रात सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

## प्रगतशील शेतकरी भारत बापूराव जाधव यांना राज्यस्तरीय वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार

### ताडपिंपळगाव आणि कन्नड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - कन्नड तालुक्यातील ताडपिंपळगाव येथील प्रगतशील आणि प्रयोगशील शेतकरी श्री. भारत बापूराव जाधव यांना महाराष्ट्र शासनाचा अत्यंत प्रतिष्ठेचा वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार जाहीर झाला आहे. राज्य सरकारच्या कृषी विभागाच्या वतीने दरवर्षी शेती क्षेत्रात उल्लेखनीय, नावीन्यपूर्ण आणि आदर्श कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या पुरस्कारामुळे ताडपिंपळगावसह संपूर्ण कन्नड तालुका आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

**आधुनिक तंत्रज्ञान आणि कष्टाचे फळ**

भारत जाधव यांनी पारंपरिक शेतीला फाटा देत आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अतिशय प्रभावी वापर आपल्या शेतीत केला आहे कमी खर्चात आणि उपलब्ध साधनसामग्रीत जास्तीत जास्त शाश्वत उत्पादन कसे घ्यावे, याचे उत्तम उदाहरण त्यांनी परिसरातील शेतकऱ्यांसमोर ठेवले आहे. शेतातील विविध प्रयोग, जलसंधारणाचे नियोजन आणि सातत्यपूर्ण परिश्रमांमुळेच त्यांच्या नावाची या सर्वोच्च पुरस्कारासाठी निवड करण्यात आली



आहे.

**१ जुलै रोजी मुंबईत होणार सन्मान**

स्मृतीचिन्ह, मानपत्र आणि रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. येत्या १ जुलै रोजी (कृषी दिनाचे औचित्य साधून) मुंबई येथे आयोजित एका विशेष दिमाखदार सोहळ्यात माननीय राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांच्या शुभहस्ते भारत जाधव यांना हा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे.

**परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव**

भारत जाधव यांना हा मानाचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याची बातमी समजताच ताडपिंपळगाव आणि कन्नड परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि मित्रपरिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा मोठा वर्षाव होत आहे. हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून सर्व कष्टकरी शेतकऱ्यांचा सन्मान आहे, अशी भावना जाधव यांनी व्यक्त केली आहे.







## सिडकोच्या शालिवाहन शाखेतर्फे हिंदू साम्राज्य दिन उत्साहात संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर (सुधीर कोर्टीकर) - विवेकानंद उद्यान सिडको एन फोर मधील वस्तीचा हिंदू साम्राज्य दिन कार्यक्रम घेण्यात आला याप्रसंगी संभाजीनगर विभाग संघचालक माननीय बबनरावजी जगाडे, चिकलठाणा जिल्हा संघचालक विजयजी लेकूरवाळे, चंद्रगुप्त नगर संघचालक अशोकजी बाहेती, नगर कार्यवाह प्रसादजी पैठणकर तसेच एन ४ वस्ती प्रमुख उदयजी देशपांडे हजर होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे अनिल सूर्यवंशी व प्रमुख वक्ते डॉ. वि.ल. धारुरकर यांचे सखोल व्याख्यान झाले.

आपल्या व्याख्यानात डॉ.वि.ल. धारुरकर म्हणाले छत्रपती शिवाजी महाराजांनी हे जाणले होते जो समुद्रावर कब्जा करेल तोच या दख्खनवर राज्य करेल म्हणून राजा शिवछत्रपतीनी समुद्रावर दुर्ग बांधले. मजबूत आरमार उभे केले. उद्योग क्षेत्रात मोठी यंत्रणा उभी केली. आपल्या संपूर्ण साम्राज्यात रयतेसाठी उत्तम अशी पाण्याची व्यवस्था उभी केली. शिवरायांच्या काळात सर्व अठरापगड जाती पातीच्या लोकांच्या हृदयात स्वराज्याची ज्योत प्रज्वलित केली. अगणीत परदेशी पत्रकारांनी.. कादंबरीकारांनी राजाशिवछत्रपतीच्या अनेक गोष्टींची मनापासून स्तुती त्यांच्या कादंबरीमधून आदरानी त्यांच्यावर पानेच्या पाने लिहिलेली आहे. आज आपण हिंदू साम्राज्य दिन साजरा करताना आपल्या राजा शिवछत्रपती महाराजांचे स्मरण करून त्यांना मानवंदना दिली पाहिजे असेही त्यांनी पुढे सांगितले.. कार्यक्राची प्रस्तावना शालिवाहन शाखा कार्यवाह शिवशंकर मुंडे यांनी केली. तर आभार प्रदर्शन एन फोर वस्ती प्रमुख उदय देशपांडे यांनी केले. सूत्रसंचालन अमृताताई संचित पातुरकर यांनी केले. सुधीरजी गोस्वामी यांनी पोवाडा सादर केला. त्यांचाही सत्कार तसेच सुरेशजी गुठठे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी अल्पोपहार व चहाचा कार्यक्रम ठेवला होता त्यांचाही सत्कार करण्यात आला. तसेच अँड. संचित पातोनकर यांनी सभागृहाला फॅन ट्यूब फोकस बसवून दिल्याने सर्वांचा सत्कार संघचालक यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी शालिवाहन शाखेचे सर्व आत्मीय स्वयंसेवक यांनी खूप मेहनत घेऊन हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यात मदत केली.

## रामचंद्र अनंत जाधव गुरुजी यांचे निधन

ज्योतिर्मय साहित्य

निनाम : रामचंद्र अनंत जाधव गुरुजी, निनाम यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी दिनांक २४ /०६/२०२६ रोजी निधन झाले. ते एक हुशार संयमी मनमिळावू व्यक्तिमत्व होते. त्यांना समाजसेवेची खूप आवड होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी घडले. अनेक विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करून घडविण्याचे काम त्यांनी केले. आज त्यांचे अनेक विद्यार्थी मोठ्या पदावर कार्यरत आहेत. त्यांना स्वच्छतेची पण खूप आवड होती. गावातच नव्हे तर नोकरीच्या ठिकाणी ही अनेक सार्वजनिक कामे त्यांनी केली आहेत.

मंदिरात गेले तरी प्रथमतः साफसफाई करायचे आणि नंतर नमस्कार करायचे. त्यांनी माणसात देव बघितला. देव नाही असे नाही पण मनापासून केलेली पूजा हीच खरी ईश्वर पूजा आहे अशी त्यांची धारणा होती. त्यांनी नोकरीची सुरुवातीची काही वर्षे पळशी (खंडाळा) त्यानंतर सासपडे त्यानंतर निनाम या ठिकाणी आपली सेवापूर्ती केली.


एक उत्तम लेखक, कवी, एक उत्तम गणिततज्ञ, चित्रकार, असे व्यक्तिमत्व. आपल्यापासून इतरांना त्रास होऊ नये ही त्यांची विचार सरणी त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत जपली. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा सून चार मुली जावई नऊ नातवंडे असा परिवार आहे.

समाजसेवा सुसंस्कारातून घडलेलं व्यक्तिमत्व एक महान कधीही न विन्मुख सतत हसत मुख जणू उमलत्या फुलासमान त्यांचे सावडणे व दशक्रिया विधी शुक्रवार दिनांक २६/०६/२०२६ रोजी निनाम रक्षाभूमी या ठिकाणी होणार आहे. शोकाकुल - समस्त जाधव परिवार

## हिमालयातील वनसंपत्ती

### भारताची हरित संपदा

सौ सुरेखा राजेंद्र शेजवळ
माजी उपशिक्षिका कन्या शाळा,
सातारा. मो. 9822749758



पुढे....

■ आर्थिक परिणाम : औषधी वनस्पतींची उपलब्धता कमी होते. पर्यटन उद्योगाला फटका बसतो. स्थानिक रोजगार कमी होतो.

■ संरक्षणासाठी उपाययोजना : १. मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण, स्थानिक प्रजातींची लागवड करणे. २. सामाजिक वनीकरण, गावकऱ्यांचा वनसंवर्धनात सहभाग वाढवणे. ३. अवैध वृक्षतोड रोखणे कठोर कायदे व प्रभावी अंमलबजावणी.
४. शाश्वत पर्यटन पर्यावरणपूरक पर्यटनाला प्रोत्साहन.
५. औषधी वनस्पतींची लागवड नैसर्गिक साठ्यावरचा ताण कमी करणे.
६. जनजागृती शाळा, महाविद्यालये आणि समाजामध्ये वनसंवर्धनाची जाणीव निर्माण करणे.

हिमालयातील वने म्हणजे भारताच्या पर्यावरणाची हिरवी कवचकुंडले आहेत. ही वने केवळ लाकूड, औषधे किंवा रोजगार देत नाहीत, तर गंगा-यमुना यांसारख्या जीवनदायिनी नद्यांना जन्म देतात, मान्सूनचे संतुलन राखतात आणि लाखो जीवसृष्टीचे पालनपोषण करतात.
देवदारांच्या उंच शेंड्यांतून वाहणारा वारा, ब्रह्मकमळाच्या पाकळ्यांवर विसावलेले दवबिंदू आणि संजीवनीच्या कथांनी भारलेली हिमालयाची भूमी आपल्याला एकच संदेश देते "वनांचे रक्षण म्हणजे जीवनाचे रक्षण."
हिमालयाची ही हरित संपदा पुढील पिढ्यांसाठी जपणे ही केवळ शासनाची नव्हे, तर प्रत्येक भारतीयाची सामूहिक जबाबदारी आहे. ज्या दिवशी आपण एका वृक्षात संपूर्ण पृथ्वीचे भविष्य पाहू, त्या दिवशी हिमालय पुन्हा पूर्वीइतकाच हिरवा, समृद्ध आणि जीवनदायी बनेल.

## ज्ञान, मूल्ये आणि शिक्षण व्यवस्थेची वास्तविकता

ॲड. प्रा. कौशिक म. हरणे मो. ९६७३१७५१९७



मागील अंकावरून पुढे...
माझे शिक्षण कायदा या विषयात सुद्धा झालेले आहे. कायदा हा कोणत्याही समाजाचा कणा मानला जातो. समाजात सुव्यवस्था, न्याय आणि शांतता टिकवून ठेवण्याचे कार्य कायदा करतो. जर कायद्याचे अस्तित्व संपुष्टात आले, तर समाजव्यवस्था कोलमडून पडण्यास वेळ लागणार नाही. म्हणूनच मानवाने समाजहितासाठी विविध नियम आणि कायदे निर्माण केले. परंतु केवळ कायदे निर्माण करून किंवा त्यांना अधिक कठोर बनवून गुन्हेगारी पूर्णपणे रोखता आलेली नाही. पूर्वीही गुन्हे होत होते आणि आजही होत आहेत. विशेष म्हणजे, आज आपण पाहतो अनेकदा गुन्हे करणाऱ्या व्यक्ती अशिक्षित नसून चांगले सुशिक्षित व्यक्तीदेखील असतात. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, समाजाला केवळ साक्षर किंवा सुशिक्षित बनवून चालणार नाही. तसेच फक्त कठोर कायदे करूनही अपेक्षित परिवर्तन घडणार नाही. समाज नैतिकदृष्ट्या जागरूक आणि मूल्यनिष्ठ असणे तितकेच आवश्यक आहे. कायदा एखाद्या गुन्हेगाराला त्याच्या कृत्याबद्दल शिक्षा देऊ शकतो; परंतु एखाद्या व्यक्तीला गुन्हा करण्यापासून परावृत्त करण्याचे सामर्थ्य तिच्या अंतःकरणात रुजलेल्या नैतिक मूल्यांमध्ये असते. भीतीमुळे कायद्याचे पालन केले जाऊ शकते, परंतु मूल्यांमुळे योग्य वर्तन स्वेच्छेने स्वीकारले जाते. म्हणूनच नैतिकता आणि मूल्ये ही कोणत्याही सुदृढ समाजाची खरी पायाभरणी आहेत.
आजच्या स्पर्धात्मक, भौतिकतावादी आणि वेगाने बदलणाऱ्या युगात नीतिमूल्यांवर आधारित शिक्षण ही काळाची गरज बनली आहे. विद्यार्थ्यांना ज्ञान, कौशल्ये आणि रोजगारक्षमतेबरोबरच नैतिकतेची जाणीव देणे, सामाजिक बांधिलकीची भावना विकसित करणे आणि जबाबदार नागरिकत्वाची शिकवण देणे हे प्रत्येक प्राध्यापकाचे कर्तव्य आहे. कारण शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट केवळ पैसे कमविणे नसून, उत्तम चारित्र्यसंपन्न आणि समाजहिताची जाणीव असलेले नागरिक घडवणे हेच आहे. अशा मूल्याधारित शिक्षणातूनच न्यायप्रिय, संवेदनशील आणि प्रगत समाजाची निर्मिती होऊ शकते.
प्राध्यापक म्हणून शिक्षण क्षेत्रात काम करताना काही गोष्टी प्रकर्षाने जाणवल्या. आज अनेक शैक्षणिक संस्था NAAC, NBA आणि इतर मानांकन प्रक्रियांमध्ये A, A+, A++ असे उच्च दर्जे प्राप्त करण्याच्या स्पर्धेत इतक्या गुरफटल्या आहेत की शिक्षणाचे मूळ उद्दिष्टच विसरल्यासारख्या वाटतात. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे, पुढील उद्याच्या अंकात......



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

पुढे.....
गुरु-शिष्याचे नाते, बंधुत्वाचे नाते, ज्येष्ठ-श्रेष्ठांचे मान-सन्मान सत्तेच्या सारीपाटावर पणाला लावले गेले. जेव्हा नात्यांमध्ये कर्तव्याऐवजी स्वार्थ आणि प्रेमाऐवजी मत्सर जागा होतो, तेव्हा महाभारतासारखा विनाश अटळ असतो, हाच धडा आपल्याला इतिहासाने दिला. आज आपण एकविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, म्हणजे वर्तमान परिस्थितीत जगत आहोत. आजची कुटुंब व्यवस्था एका अत्यंत संवेदनशील वळणावर उभी आहे. काळाने आणि आधुनिकतेने आपल्यासमोर अनेक नवी आव्हाने उभी केली आहेत. तंत्रज्ञानाच्या जाळ्याने आपल्याला जगभरातल्या लोकांशी जोडले असले, तरी शेजारी बसलेल्या आपल्या माणसापासून आपण दुरावत चाललो आहोत की काय, अशी भीती वाटू लागली आहे. एकत्र कुटुंब पद्धती मागे पडून विभक्त कुटुंबे आली आणि आता तर 'फ्लॅट संस्कृती'मध्ये माणसे अधिक आत्मकेंद्रित होऊ लागली आहेत. नात्यांची वीण उसवू लागली आहे. नात्यांच्या या महावस्त्राचं रूपांतर एखाद्या टॉवेलमध्ये होतं की काय, अशी भीती वाटू लागली आहे. टॉवेलला आपण गरजेपुर्ते हात पुसतो आणि बाजूला ठेवतो. नाती अशी असतात का ?
आजच्या या गतिमान, यांत्रिक युगात संवाद हरवत चालला आहे आणि जिथे संवाद संपतो, तिथे नात्यांची वीण सैल होऊ लागते. संवाद नसलेली नाती म्हणजे केवळ नावापुरती उरलेली नात्यांची एक चौकट. आजच्या तरुण पिढीसमोर आणि आपल्या सर्वांसमोरच हे मोठे आव्हान आहे की, या बदलत्या काळात नात्यांमधील पूर्वीचा तो ओलावा, तो जिव्हाळा आणि ती विश्वासाची ऊब कशी टिकवून ठेवायची?
एक गोष्ट मात्र नक्की की स्नेहजलाचं सिंचन झालं की नाती उमलून येतात. स्नेह जाऊन त्याची जागा स्वार्थाने घेतली की नाती कोमेजतात. म्हणूनच जिथे अकृत्रिम प्रेम असते आणि केवळ स्वार्थाला थारा नसतो तिथले नात्यांचे रंग कधीही फिके होत नाहीत.
याच सगळ्या गदारोळात, मनात एका नव्या सृजनाचा अंकुर फुटला. मनात आले, काळाच्या प्रवाहात आपण जे मागे सोडत चाललो आहोत, याची पुनश्च एकदा जाणीव करून द्यायला हवी. वस्त्रातील उभे-आडवे धागे जसे प्रेमाने एकत्र येतात आणि एकमेकांना घट्ट पकडून ठेवतात, तसाच हा दिशाहीन होत चाललेला समाज पुन्हा एकदा नात्यांच्या सूत्रात गुंफायला हवा. या विचारातूनच 'नात्यांचं महावस्त्र' या लेखमालेचा जन्म होतोय. महावस्त्र हे वेगवेगळ्या रंगांच्या, रेशमी मुलायम पण बळकट अशा धाग्यांच्या एकत्र विणण्यातून तयार होतं. या लेखमालेच्या माध्यमातून आपण आपल्या आयुष्यातील अशाच काही अमूल्य, रेशमी नात्यांचे पदर उलगडणार आहोत. आईचे निःस्वार्थ वात्सल्य, बाबांचे आकाशाएवढे छत्र, आजी-आजोबांच्या संस्कारांची शिदोरी, भाऊ-बहिणीचे निखळ प्रेम, मावशी आणि काकांचा मायेचा आधार, सुख-दुःखात पाठीशी राहणारा मित्र आणि आपल्याला अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा गुरु...या सर्व नात्यांच्या अंतरंगात डोकावण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत.
या महावस्त्राचा एक-एक धागा आपण अत्यंत मायेने आणि जिव्हाळ्याने जाणून घेण्याचा प्रयत्न करू या. हे महावस्त्र जितकं सुंदर विणलं जाईल, तेवढं आपलं घर, आपला समाज आणि आपले जगणं अधिक सुकर आणि आनंदी होईल. या वैचारिक आणि भावनिक प्रवासात आपण माझ्या सोबत नक्कीच असाल, ही खात्री आहे. (पुढील भाग दर रविवारी )

## लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज !

ज्योतिर्मय साहित्य

आज २६ जून, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती. आजच्याच दिवशी १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर ( करवीर ) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी




१९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले जेंव्हा हे शाहू महाराजांना समजले तेंव्हा त्यांनी २५०० रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे. व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. जयंतीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# समता, न्याय, बंधुतेची ओळख म्हणजे राजर्षी छत्रपती शाहुजी महाराज

ज्योतिर्मय साहित्य




आपल्या महाराष्ट्रात अनेक थोर, महान, विचारवंत, समाजसुधारक, विद्वत्ते, तत्वज्ञ लोक होऊन गेले. त्यातील प्रामुख्याने व आदराने घेतले जाणारे नाव म्हणजे ''राजर्षी शाहु महाराज'' शाहु महाराज हे एक सक्षम, प्रखर, तडफदार राज्यकर्ते होते. शाहु महाराजांनी त्यांच्या जीवन कार्यकाळात अनेक यशस्वी कार्य केले. व पुरोगामी धोरणे यशस्वीरित्या राबवून समाज सुधारणा केली.

शाहु महाराजांनी त्यांच्या राज्यातील मागास, अति मागास जातीतील लोकांसाठी समानतेचे महत्वपूर्ण कार्य केले. कुठल्याही प्रकारचा जात-पात, पंथ, धर्म, वंश यांचा विचार नं करता सर्वांना व सर्व जाती धर्मातील, पंथातील लोकांना प्राथमिक शिक्षण देणे हेच एकमेव प्राधान्य समजले. शाहु महाराजांनी हे समानतेचे सामाजिक कार्य करुन सर्व स्तरातील लोकांना न्याय मिळवून, त्यांचा सर्वांगीण विकास करत देत त्यांना पुढे नेले.

ब्रिटिश राजवटीच्या काळात सामान्य जनतेला समान न्याय मिळवून देऊन बहुजन समाजाच्या सामाजिक विकास, उद्धार व उन्नतीसाठी शाहु महाराजांनी प्रयत्न केले. सामाजिक उन्नती, सामाजिक विकास, सामाजिक परिवर्तन, व सामाजिक उद्धाराला गती प्राप्त करुन दिली. दलित व बहुजनांच्या विकासात आड येऊ पाहणाऱ्या वर्गाला त्यांनी दूर सारले. कुठल्याही विचारांना नं जुमानता दलित, बहुजन, वंचित, पिछडा, मागास व तळागाळातील समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक विकासात शाहु महाराजांनी अतिशय महत्वाची भूमिका बजावली.

आपला महाराष्ट्र म्हणजे संतांची भूमी. या संतांच्या भूमिला कित्येक थोर समाजसुधारक लाभले. फुले, शाहु, आंबेडकर, राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज. यांनी समाजातील तळागाळातील व सर्व स्तरातील लोकांसाठी जीवाचे रान करून त्यांना वर काढण्याचे कार्य केले. शाहु महाराज समाजातून जातीयता समूळ नष्ट व्हावी यासाठी महत्वपूर्ण समानतेचे कार्य केले.

आंतरजातीय विवाहास मान्यता दिली, अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी शाहु महाराजांनी ज्या गोष्टी सवर्णासाठी होत्या त्या सर्व गोष्टी अस्पृश्य, बहुजन, दलित, वंचित यासाठी खुल्या करुन दिल्या. संपूर्ण भारतात आरक्षणाचे जनक म्हणून छत्रपती राजर्षी शाहु महाराजांचे नाव गर्वाने घेतले जाते.

त्या काळी कलागुणांना वाव देत शाहु महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, लोककला, चित्रकला, कुस्ती ई. सर्व क्षेत्रातील कलावंतांना वाव दिला त्यांना राजाश्रय दिला. त्यांचे मनोबल वाढवून त्यांना प्रोत्साहन दिले. सामाजिक सुधारणा, जातीभेद निर्मूलन, शिक्षण प्रसार, महिला हक्क, अस्पृश्य निवारण, जातीनिहाय शाळा, वसतिगृह ई. ही सर्व शाहु महाराजांच्या जीवन कार्यातील महत्वपूर्ण कार्य होय.




अशा या लोकराजाचा मृत्यू मुंबई येथे ६ मे १९२२ साली झाला. अक्खा महाराष्ट्र शोक सागरात बुडाला.

***

## डॉक्टर नावाचा माणूस पुस्तकावर उद्या चर्चासत्र

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - साहित्य भारती जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. उपेंद्र कुलकर्णी व डॉ. रमेश रावळकर लिखित डॉक्टर नावाचा माणूस या पुस्तकाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा (पुणे) गणेश सरस्वती ठाकुर देसाई विशेष ग्रंथकार पुरस्कार -२०२५ प्राप्त झाल्याबद्दल लेखकांचा सत्कार व पुस्तकावरील चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम शनिवारी, २७ रोजी सायंकाळी ६ वाजता गोविंदभाई श्रॉफ कला अकादमीचे नाट्यगृह, स.भु. परिसर येथे होणार आहे.

अध्यक्षस्थानी अभाविपचे माजी प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. सर्जेराव ठोंबरे राहणार आहेत. प्रमुख वक्ते म्हणून दत्ता जोशी आणि कृत्रिम दंतशास्त्र तज्ज्ञ डॉ. आदित्य कुलकर्णी उपस्थित राहून पुस्तकाविषयी मनोगत व्यक्त करणार आहेत. यावेळी साहित्य भारतीचे देवगिरी प्रांताध्यक्ष प्रा. डॉ. सर्जेराव जिगे तसेच देवगिरी प्रांत कार्याध्यक्ष उमेश काळे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

साहित्य भारतीचे जिल्हाध्यक्ष प्रा. विजय पोहनेकर व कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश खरात यांनी साहित्यप्रेमी, वाचक, अभ्यासक आणि नागरिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

## फ्रेंड्स ऑफ ट्रायबल सोसायटी, पुणे तर्फे डॉ. श्याम कुलकर्णी यांचा गौरव

ज्योतिर्मय साहित्य



बाणेर, पुणे - हिंदू साम्राज्य दिनाचे औचित्य साधून बाणेर येथील श्रीभगवती मंदिर सभागृहात ओंजळ ग्रुपच्या वतीने शबरी वस्ती परिसरातील ७७ गरजू विद्यार्थ्यांना शालेय दप्तर व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबत उत्साह निर्माण झाला.

याच कार्यक्रमात सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी उपक्रमांमध्ये सातत्याने योगदान देत श्रीभगवती सेवा आश्रमाच्या विविध कार्यात मोलाचा सहभाग नोंदविल्याबद्दल डॉ. श्याम कुलकर्णी यांचा फ्रेंड्स ऑफ ट्रायबल सोसायटी, पुणे यांच्या वतीने सन्मानचिन्ह प्रदान करून विशेष गौरव करण्यात आला.

समाजसेवक तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. अशोकजी नवाल, चैतन्य गायन कक्ष्याचे श्री. प्रदीपराव देशपांडे तसेच दैनिक तरुण भारत, पुणे चे प्रतिनिधी श्री. गुणवंतराव जाधवर यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. कुलकर्णी यांच्या समाजहिताच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक केले. समाजातील वंचित घटकांच्या उन्नतीसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान हा समाजासाठी प्रेरणादायी ठरत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# अनुभव श्रेष्ठ का टि ई टी ?

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)


आता त्याच्या शिकविण्यानं त्याच्या पहिल्या वर्गातील मुलांना बरोबर वाचताही येत होतं व प्रश्नांची उत्तरंही नीट लिहिता येत होती. सांगायचं तात्पर्य एवढंच की टि ई टी परिक्षेतून केवळ पोपटपंची करणारा प्रकांडपंडीत नक्कीच बनवता येईल. परंतु खरा हाडामासाचा, अनुभव संपन्न शिक्षक कधीच बनवता येणार नाही. त्यासाठी गरज असते अनुभवाची. जो अनुभव टि ई टी परिक्षा घेतल्यानं प्राप्त होत नाही. त्यासाठी गरज असते अध्यापन करतांना आलेले अनुभव. जे जेष्ठ शिक्षकांमध्ये सरावानं विकसीत झालेले असतात. टि ई टी परिक्षेच्या माध्यमातून आलेले नसतात.

शिक्षक....... शिक्षक हा सर्वगुणसंपन्न असावा. असं म्हणतात आणि तोही असतोच. कारण शिक्षकात सर्वगुणसंपन्नतेचे गुण असतातच. परंतु न्यायपालिका त्याला सर्वगुणसंपन्न समजत नाही व त्याचा विकास करण्याचा विचार करते, टि ई टी माध्यमातून.

टि ई टी माध्यम. शिक्षकांना सर्वगुणसंपन्न करणारा एक भाग. ज्यातून शिक्षक अभ्यास करु शकतील. शिक्षकांना जागतिक स्तराची माहिती होईल. हा भाग न्यायपालिकेचा. म्हणूनच टि ई टी परिक्षा.

म्हटलं जातं की शिक्षक हा टि ई टी परिक्षेतून अपडेट होईल. त्याला जागतिक स्तराचं ज्ञान प्राप्त होईल आणि ते न्यायालयाचं बरोबरही आहे. कारण शिक्षक जेव्हा टि ई टी चा अभ्यास करतो. तेव्हा तो करीत असतांना त्या अभ्यासात अशी अशी गणिताची उदाहरणे असतात की ज्याची गरज विद्यार्थ्यांना पडते. असा असा इंग्रजीचा भाग असतो की ज्यातून इंग्रजीचं सर्वकष ज्ञान त्याला प्राप्त होवू शकते. त्यातच मराठी विषयाचं सर्वच प्रकारचं व्याकरण आहे की ज्यातून त्याला मराठी विषय चांगला माहीत होवू शकतो. तसंच मानसशास्त्राचा अभ्यास होवून त्याला विद्यार्थ्यांचं मानसशास्त्र ओळखण्याची पद्धती माहीत होवू शकते. तसंच सामान्यज्ञानाचाही अभ्यास होवू शकतो त्याला. अर्थातच टि ई टी परिक्षा ही शिक्षकांना अपडेट करणारी प्रक्रिया आहे. दुसरा महत्वपुर्ण मुद्दा म्हणजे खाजगी शाळेतील शिक्षक. खाजगी शाळेत शिक्षकांची नियुक्ती ही पैशाच्या आधारावर झालेली असते. ज्यात लायक असलेले, नसलेले शिक्षक पैशाच्या माध्यमातूनच भरले जातात. त्यात दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे अशा शाळेत शिक्षक म्हणून नियुक्त करणारा त्या शाळेचा मालक असलेला संस्थाचालक हा आपल्या बऱ्याच नातेवाईकांनाही नियुक्त करतो. ज्यांना जागतिक स्तरावरील पुरेसं ज्ञान नसतं व ते नात्यातीलच असल्यानं आपलं कोणी काहीच बिघडवू शकत नाही. ही भावना ठेवून आपलं ज्ञान अद्ययावत करीत नाहीत. अशांचं ज्ञान अद्ययावत करण्यासाठी टि ई टी परिक्षा महत्वपुर्णच ठरते. तिसरा मुद्दा म्हणजे काही काही शिक्षक हे तालुक्याला शिकवतच नाही. ज्यात जेष्ठ शिक्षक असतात. हे शिक्षक राजकारणात असतात व ते राजकारणातच असल्यानं त्यांच्यावर राजकीय आशीर्वाद असतो अर्थात राजकीय नेत्यांचा आशीर्वाद असतो. असे शिक्षक शाळेत गेले, नाही गेले तरी त्यांना कोणी क्षती पोहोचवू शकत नाही. तसं पाहिल्यास हे जेष्ठ शिक्षक असतात. हे जंगल परीसरातील शाळेत घडतं.

वरील प्रकारचे शिक्षक असतात समाजात. ज्यात विद्यार्थ्यांचा दोष नसतोच. मात्र त्यांचा दोष जरी नसला तरी त्यांना भोगावेच लागतात अज्ञानाचे भोग. कोणामुळं तर शिक्षकांच्या चुकीमुळं. का? शासन त्यांना वेळेवर वेतन देत नाही काय? त्यांना हक्काच्या सुट्ट्या देत नाहीत काय? त्यांना आवश्यक पोषक भत्ते देत नाहीत काय? देतं. तरीही काही शिक्षक आपल्या मनमर्जीनुसार वागत असतात. अशाच शिक्षकांसाठी न्यायपालिकानं शासनाच्या माध्यमातून टि ई टी लागू केली. ज्यात शिक्षक हा ग्रामीण भागातील असो, तो खाजगी शाळेतील असो, तो राजकारणातील असो वा तो सेवाजेष्ठ असो. त्याबाबतीत कोणताच विचार केलेला नाही. सरसकट सरूवांनाच टि ई टी लागू केली. ठरवलं की जे




शिक्षक खरंच हाडाचे शिक्षक आहेत. ज्यांना अपडेट होण्याची गरज आहे. ते अपडेट होतीलच. या सर्व गोष्टी विद्यार्थी हितासाठी अत्यावश्यक आहे. ज्यातून नातेवाईक असलेले शिक्षक गळतील. त्यांच्यात योग्यता नसेल तर........ ज्यातून राजकारणात असलेले व शाळेवर न जाणारे शिक्षक गळतील, जर योग्यता परिपूर्ण नसेल तर. अन् असे शिक्षक गळतील. जे आळशी असतील, कुशाग्र बुद्धीचे नसतील. म्हणूनच टि ई टी.

न्यायपालिकेचं म्हणणं बरोबर आहे. टि ई टी शिक्षकांना अद्ययावत करण्याची प्रक्रिया. त्यातच त्यातून शिक्षक अपडेट होईल असं न्यायपालिकेला वाटतं. परंतु हे जरी न्यायपालिकेचं बरोबर असलं तरी टि ई टी परिक्षा कोणी द्यावी? सर्वांनीच द्यावी, शिक्षकांना अद्ययावत करण्यासाठी. ज्यातून शिक्षक बनण्यासाठी आलेले हवसे, नवशे, गवशे गळतीलच. परंतु यात दोष असा की काही काही शिक्षक असेही आहेत की जे हवशे, गवशे, नवशे गटात मोडत नाहीत. जे हाडाचे शिक्षक आहेत. जे इमानदारीनं वर्गात जातात. आपल्या विद्यार्थ्यांना सर्वगुणसंपन्न बनविण्यासाठी सर्वकष पद्धतीनं ज्ञान देतात. ज्यातून विद्यार्थी व्यवस्थित शिकतात.

विद्यार्थी हितासाठी शिक्षकांना अपडेट करीत असतांना न्यायालयानं शिक्षकांचं ज्ञान वाढविण्यासाठी टि ई टी परिक्षा आणली. ज्यातून शिक्षक अद्ययावत होईल. शिक्षक व्यवस्थित अभ्यास करुन ते बरंच काही शिकतील. हे बरोबर आहे. परंतु केवळ कोणत्याही गोष्टीचं प्रकांड पंडीत असणं बरोबर नाही, जर ते ज्ञान त्यांना इतरांना दःता येत नसेल तर....... आजच्या काळात बऱ्याचशा शाळेतील वर्गाचं निरीक्षण केलं असता व शिक्षकांना प्रश्न विचारले असता शिक्षकांना बऱ्याच प्रश्नांची उत्तरं येतांना दिसतात. कारण त्यांना ज्ञान असतं. तशीच तुटक्या शब्दात उत्तरं विद्यार्थ्यांना येत नाही. ही शोकांतिकाच आहे. बऱ्याचशा शाळेत काही काही विद्यार्थ्यांनाही वाचता येत नाही. त्या शाळेतील शिक्षकांना सखोल ज्ञान असलं तरी. ही वास्तविकताच आहे. याचं कारण म्हणजे केवळ प्रकांपंडीत असल्यानं चालत नाही. त्या ज्ञानाचा तुम्हाला वापर तरी व्यवस्थित करता यायला हवा ना. आजच्या काळात नापास न करण्याच्या प्रकारानं मुलं आठवी पास तर होतात. परंतु ज्यावेळेस ती नवव्या वर्गात जातात. तेव्हा त्या मुलांना धड वाचताही येत नाही. याबाबतीत कसं शिकवायचं. हे कोणीच सांगत नाही. त्यासाठी कौशल्य लागतं व ते कौशल्य कोणत्याच शाळेत शिकवलं जात नाही. कोणीच त्याबद्दल मार्गदर्शन करीत नाही. फक्त मार्गदर्शन व समुपदेशन केवळ त्यानं इतर बऱ्याच गोष्टी शिकाव्यात यासाठी दिलं जातं. त्यात त्याला पोपटपंचीद्वारे शिकवलं जातं. याबाबतीत एक कथा आहे. एक पोपट पोपटपंची शिकला होता. जसे, शिकारी येतात. दाणे टाकतात. आपल्याला प्रलोभन देतात. मग पकडून जातात. तो रोज तेच बोलायचा. परंतु जेव्हा वेळ आली व शिकारी आला. तेव्हा फक्त तो पोपंटपंचीच वदला. शिकारी येतात.

दाणे टाकतात. प्रलोभन देतात व पकडून नेतात. परंतु स्वतःला वाचविण्या संदर्भात त्यानं कोणत्याच हालचाली केल्या नाहीत व मरण पावला.

राबवली जाणारी टि ई टी परिक्षा अशीच. शिक्षकांना पोपटपंची शिकविणारी. या परिक्षेतून निश्चितच शिक्षक अद्ययावत होतील. परंतु ते केवळ पोपटासारखे ज्ञानानं अद्ययावत होतील. कृतीनं नाही. त्यामुळंच विद्यार्थ्यांना वाचन येण्याच्या क्रियेवर पोपटाच्या पोपटपंचीसारखंच पाणी पडेल. ज्यातून विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्याची शिकार होईल हे तेवढंच खरं. त्यासाठीच गरज आहे, शिक्षकांच्या अनुभवाची. ज्यातून विद्यार्थ्यांना निश्चितच वाचन येवू शकतं. हे तेवढंच खरं.

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559